## - प्रकरण दुसरे -

## कामेरी गाव

**२ अ ० :**

कामेरी गावास कामेरी हे नाव गावातील मूळ ग्रामदैवत कामेश्वरी या देवीच्या नावावरून पडले आहे. स्वातंत्र्यचळवळीत वाळवे तालुक्यात - महत्वाचे स्थान असणारे गाव आहे.

**२ अ १ : स्थान :**

कामेरी हे गाव सांगली जिल्हयात वाळवा तालुक्यामध्ये इस्लामपूर पासून दक्षिणेस ४ कि.मी. व सांगलीपासून पश्चिमेस ४२ कि.मी.वर आहे.

कामेरी १७.३ उत्तर अक्षांश तर ७४.१६ पुर्व रेखांश (अंदाजे) असे वसलेले आहे.

**२ अ २ : क्षेत्र :**

कामेरीचे एकूण क्षेत्रफळ २५८१.०० हेक्टर आहे. एकूण क्षेत्रफळा पैकी २९७.४७ हेक्टर गावठाण व २२८३.५३ हेक्टर जमीनक्षेत्र आहे. या जमीन क्षेत्रामधील १९९.१० हेक्टर गायरान व विहीरपड आहे. पीक उत्पादनासाठी २०८४.४३ हेक्टर क्षेत्र वापरले जाते. या मशागतीसाठी वापरल्या जाणा-या क्षेत्रामध्ये २०५४.२३ हेक्टर जिरायत जमीन क्षेत्र तर ३०.२० हेक्टर बागायत जमीन क्षेत्र आहे.

**२ अ ३.१ : हवामान :**

कामेरी गाव उष्ण-दमट (कोरडे) हवामानाच्या भागामध्ये येते. उन्हाळयाच्या कालखंडातील उष्ण हवामानाव्यतिरिक्त कामेरीचे हवामान आल्हाददायी असते.

३·२ पर्जन्यमान :

कामेरी गाव उष्ण-दमट हवामानात असून, नैऋत्य मोसमी वा-यापासून पाऊस मिळतो. गावामध्ये पर्जन्यमापक नाही· परंतु नजीक पर्जन्यमापन केंद्र असणा-या इस्लामपूरच्या नोंदीनुसार पर्जन्यमान तक्ता २·१ प्रमाणे आहे·

तक्ता २·१

| सन | सरासरी | पर्जन्यदिवस | पर्जन्य |
|---|---|---|---|
| १९८२ | ६३९ मि·मि· | ५७ | ८६१ मि·मि· |
| १९८३ | ६३९ मि·मि· | ५४ | ५७५ मि·मि· |
| १९८४ | ६३९ मि·मि· | ३८ | ४४३ मि·मि· |
| १९८६ | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |

उत्तरोत्तर पर्जन्यमान कमी होत चालले आहे· परिणामी पावसावर अवलंबून असणा-या शेतीमध्ये ( विहीरीचे पाणी कमी होत गेल्याने) - जिरायत शेतीचे क्षेत्रामध्ये वाढ होत आहे·

३·३ तपमान :

गावचे तपमान (सरासरी) कमाल ३८·७ डिग्री·से·तर किमान सरासरी १३·९ डिग्री·से· आहे·

२ अ ४ : पीके :

असमाधानकारक पर्जन्यमान व पाणीपुरवठयाच्या सोयीच्या अभावामुळे जिरायत जमीन क्षेत्रामध्ये वाढ झाली आहे· जिरायत -

.... १३/-

जमीनीमध्ये ज्वारी,हायब्रीड,गहू,उडीद,मूग, तुर चवळी,मिरची व
धान्यपीके तर भुईमूग, सुर्यफुल,करडई,सारख्या तेल बियांचे उत्प
जाते. बागायत जमीनीमध्ये ऊस,गहू,भाजीपाला,केळी,पेरु सारख
उत्पादन घेतले जाते.

## २ अ ५ : लोकसंख्या :

५.१ तक्ता २.२

कामेरी गावातील लोकसंख्या

| सन | एकूण | पुरुष | ि |
|---|---|---|---|
| १९४१ | ४,८२३ | २,४७० | २, |
| १९५१ | ५,९९८ | ३,०१५ | २, |
| १९६१ | ६,४४३ | ३,२९० | ३, |
| १९७१ | ७,८१८ | ३,९७८ | ३, |
| १९८१ | ८,७०६ | ४,४२० | ४, |
| १९८८ | ९,२७८ | ४,७०४ | ४, |

१९८१ च्या जनगणनेनुसार ८,७०६ या एकूण लोकसंख्ये
अनुसुचीत जातीचे पुरुष व ५२१ अनुसुचीत जातीच्या स्त्रिया आ
अनुसुचित जमातीचे ५ पुरुष व ४ स्त्रिया आहेत.

१९८७-८८ मधील आकडेवारीनुसार कामेरीमध्ये दारी
कुटुंबाची संख्या ६९० आहे. यामधील २२५ व्यक्तींना दारीद्रय
योजनांचा लाभ मिळालेला आहे.

५·२

## तक्ता २·३

### - लोकसंख्येचे वर्गीकरण -
(१९८१)

| | साक्षर | काम न करणारी लोकसंख्या | सीमांत काम करणारी लोकसंख्या | काम करणारी लोकसंख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शेतकरी | शेतमजूर | घरगुती उद्योग | इतर कामगार | एकूण कामगार लोकसंख्या |
| पुरुष | २,८६२ | १,९०६ | १३८ | १,३७३ | ३९२ | १३९ | ५०४ | २,४०८ |
| स्त्रिया | १,६७७ | ३,१३४ | ४०१ | २६८ | २७३ | ११२ | ६६ | ७१९ |
| एकूण | ४,५३९ | ५,०४० | ५३९ | १,६४१ | ६६५ | २५१ | ५७० | ३,१२७ |

.... १६/-

कामेरी गावातील लोकसंख्येचे १९८१ च्या शिरगणतीप्रमाणे होणारे वर्गीकरण तक्ता २·३ मध्ये दिलेले आहे साक्षरतेचे गावातील प्रमाण ५२·०७ टक्के इतके होते· पुरुषांमधील साक्षरतेचे प्रमाण ६४·७५ टक्के व स्त्रिया - मधील प्रमाण ३९·१ टक्के इतके होते· गावातील काम करणा-यांची संख्या विचारात घेता काम करणा-या लोकसंख्येवर अवलंबून असणा-यांची संख्या दरमाणशी १·७८ टक्के इतकी होती· म्हणजे एक काम करणा-या - व्यक्तीला आपल्याला धरून २·७८ लोकांना पोसावे लागते· काम करणा-या लोकात स्त्रियांचे प्रमाण एक पंचमांश इतकेच आहे· काम करणा-या लोकात शेतकरी ५२·४८ टक्के आहेत· शेतमजूर २१·२७ टक्के,इतर काम करणारे १८·२३ टक्के आहेत· घरगुती उधोगात तर फारच कमी म्हणजे आठ टक्के लोक गुंतलेले आहेत·

५·३

लोकसंख्येचे जमीनधारणेप्रमाणे वर्गीकरण केल्यास असे दिसून येते की, कमीजास्त प्रमाणामध्ये जमीन नावावर असणारे एकूण १,९३२ खातेदार (शेतमालक) आहेत· यामध्ये एक हेक्टरपेक्षा कमी जमीन मालकी असणारे १,२२५ खातेदार, १·१ हेक्टर ते २·५ हेक्टर पर्यंत जमिनीची मालकी असणारे ५१५ खातेदार आहेत· तर २·५ हेक्टरपेक्षा जास्त मालकीची जमीन असणा-या खातेदारांची संख्या १९२ आहे·

शेतकरी व शेतमजूर यांच्यासह शेतीवर अवलंबून असणा-या लोकांची संख्या जास्त आहे·

२ अ ६ : शैक्षणिक सोयी :

प्राथमिक शिक्षणासाठी जिल्हा परिषदेतर्फे गावात तीन शाळा आहेत· त्यात ५६० विधार्थीनी व ५२५ विधार्थी आहेत असे एकूण १,०८५

विद्यार्थी शिक्षण घेतात. तसेच दोन हायस्कूलमधून ५४० मुलामुलींना माध्यमिक शिक्षण दिले जाते.

उच्च-माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणाची सोय कामेरी गावी नसल्याने अशा शिक्षणासाठी मुलांना इस्लामपूर किंवा इतरत्र बाहेरगावी जावे लागते. असे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सरासरी २५० आहे. व ती दिवसेंदिवस वाढत आहे.

२ अ ७ : पाणी पुरवठा :

१९८२ पर्यंत गावातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा ग्रामपंचायतीमार्फत विहीरीतून पाणी उपसा करुन नळपाण्याद्वारे केला जात होता. १९८२ नंतर पिण्याच्या पाण्याचा पुरवठा एम.आय.डी.सी.मार्फत कृष्णा नदीतून केला जातो. गावात वीजपुरवठा आहे.

२ अ ८ : ग्रामपंचायत :

१-११-१९४० मध्ये स्थापन करण्यात आलेल्या ग्रामपंचायतीने आपल्या ४७ वर्षांच्या कारकिर्दीत कामेरीचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. गावाला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे, विजेच्या दिव्यांची सोय करणे, रस्ते दुरुस्ती, सांडपाण्यासाठी गटार योजना, अल्प उत्पन्न - गटातील व्यक्तींना, भूहीनाना घर बांधणीसाठी जागा उपलब्ध करुन देणे इ. अनेक सामाजिक विकास यंत्रणेद्वारे कामेरीच्या विकासाची प्रयत्नशीलता दाखविली आहे.

२ अ ९ : आरोग्य सुविधा :

गावात चार खाजगी दवाखाने, एक प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. भविष्यकाळात प्राथमिक आरोग्य केंद्राचा विस्तार करुन त्याचे रुग्णालयात रुपांतर करण्यात येणार आहे.

संकरीत पशु-पैदास व पशु-उपचारासाठी जनावरांचा स्थायी दवाखाना आहे.

## २ अ १० : वहातूक सेवा :

राष्ट्रीय महामार्ग नं. ४ कामेरी गावातून जात असल्यामुळे लोकांना खाजगी ट्रक,टेंपो,इतर वहाने यांच्या सुविधा उपलब्ध आहेत. याच्या बरोबरच महत्वाची मानली जाणारी बस-सेवाही लोकांना जलद उपलब्ध होते. तसेच इस्लामपूर-कामेरी बससेवाही खास शाळेच्या मुलांच्या सोयीसाठी चालू करण्यात आली आहे.

## २ अ ११ : सहकार-विकास :

सहकाराच्या विकासातून आपला विकास या प्रयत्नातून दोन दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संस्था,दोन सहकारी सोसायट्या,एक नागरी पतसंस्था तसेच शेतजमिनीला पाणी पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी कामेरी-येडेनिपाणी संयुक्त सहकारी नळ पाणीपुरवठा संस्था स्थापन करण्यात आली आहे. या पाणीपुरवठा संस्थेचे काम सध्या चालू आहे.

## २ अ १२ : बँक सेवा :

कामेरी गावातील लोकांच्याकडील विखुरलेल्या बचतीचे एकत्रीकरण करून गरजू व्यक्तींच्या कर्जाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी राष्ट्रीयकृत - " युनियन बँक ऑफ इंडिया " व " सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक " यांची प्रत्येकी एक शाखा स्थापन करण्यात आल्या आहेत. तसेच दोन विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा सोसायट्या शेतक-यांच्या - कर्जाच्या गरजा पूर्ण करतात. त्याच बरोबर एक नागरी सहकारी पतसंस्था, तीन भिशी मंडळे इ. मार्फत लोकांच्या बचती गोळा केल्या जातात.

....१९/-

२ अ १३ : लघुउधोग व कुटीरउधोग :

सहकारी तत्वावरील चुना-भट्टी, दोन दगड फोडण्याच्या क्रेशर मशीन्स, गावानजीक आहेत. त्याचबरोबर सुतार, लोहार उधोग, कुंभार, चांभार, इ. नैमित्तिक गरजेचे उधोग गावात आहेत. गावात नगर - वाचनालयाचा सांस्कृतिक, साहित्यिक, गरजा भागविण्यात मुख्य सहभाग आहे.

२ ब : अभ्यास - पध्दती :

भारताची अर्थव्यवस्था शेतीप्रधान असूनही त्या अर्थव्यवस्थेत महत्वाच्या असलेल्या शेतमजुरांकिडे शासनाचे तसेच समाजाचे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे. ग्रामीण लोकसंख्येचा शेतमजूर हा घटक विखुरलेला व विस्कळीत आहे. त्यामुळे निदर्शने, मोर्चे, घेराव, संप इ. संघटीत मार्गांनी तो आपले प्रश्न समाजापुढे मांडू शकत नाही. अशा दुर्लक्षीत शेतमजुरांच्या परिस्थितीची तसेच समस्यांची माहिती व्हावी या उद्दीष्टाने कामेरी गावातील शेतमजुरांचा अभ्यास हाती घेतला आहे.

शेतमजुरांची आर्थीक व सामाजिक परिस्थितीची पहाणी करणे, त्यांच्या अडचणी समजावून घेणे आणि त्यावर उपाययोजना सुचविणे हे तीन उद्देश हा अभ्यास करण्यात आहेत.

संशोधन-पध्दती :

गावातील सर्व शेतमजुरांची तीन गटात अद्याक्षराप्रमाणे संपूर्ण यादी तयार केली. अल्प भू-धारक, भूहीन व छांडकरी शेतमजूर असे हे तीन गट होत यात असे दिसून आले की ४८३ शेतमजूर २४१ शेतमजूर कुटुंबामध्ये रहात आहेत. या शेतमजूरांमध्ये ३७० अल्प भू-धारक शेतमजूर १९१ - कुटुंबामध्ये, ९२ भूहीन शेतमजूर ४० कुटुंबामध्ये, तर २१ छांडकरी शेतमजूर १० कुटुंबामध्ये रहात आहेत.

.... २०/-

शेतमजुरांच्या आर्थिक पहाणीसाठी शेतमजूर हा घटक न निवडता शेतमजुरांचे कुटुंब हा घटक अभ्यासाचा पायाभूत घटक मानून अभ्यासासाठी २४१ कुटुंबापैकी निम्म्या शेतमजूर कुटुंबाचा अभ्यास करावयाचा असे ठरविले पन्नास टक्के शेतमजूर कुटुंबाचा अभ्यासासाठी वापरकरावयाचा ठरविल्यानंतर बाद पध्दतीचा वापर करुन विषम पध्दतीने (१,३,५,७,९ .....) नमुना निवड केली. या पध्दतीनुसार १९१ अल्पभू-धारक शेतमजूर कुटुंबापैकी ९३ शेतमजूर कुटुंबे,४० भूहीन शेतमजूर कुटुंबातील २२ भूहीन शेतमजूर कुटुंबे व १० छांडकरी शेतमजूर कुटुंबातील ५ छांडकरी शेतमजूर कुटुंबाची निवड करण्यात आली.

वरीलप्रमाणे नमुना निवड केल्यानंतर त्यांची यादी तयार केली. सर्वेक्षणाचे उद्देश विचारात घेवून विचारावयाच्या प्रश्नांची चार - विभागात मांडणी केली.

## २ ब १ : वैयक्तिक माहिती :

या सदरामध्ये शेतमजुरांची वैयक्तिक माहिती मिळविलेली आहे. यामध्ये शेतमजुरांचे नाव,जन्मगाव,लिंग,वैवाहिक स्थिती,शिक्षण,जात, धर्म,जमीन जिरायत, बागायत वडिलांचे नांव, जन्मगांव,शिक्षण (हयात असल्यास) वडिलांची जमीन जिरायत-बागायत कुटुंबातील व्यक्तिंची माहीती तसेच घरामध्ये बैल,बैलगाडी, नांगर औजारे,सहकारी संस्था सभासद, यांची माहिती कोंबड्या,बकऱ्या,गाई,म्हैशी,यांचा आढावा घेण्यात आला आहे.

यातून शेतमजुरांची जात-धर्म पहाणे, शेतमजूर गतिशिलता, आंतरपिढी गतिशिलता पहाणे, जमीनीच्या आकारमानाची पहाणी करणे, शैक्षणिक तुलना करणे,कुटुंबाचे आकारमान तसेच घर,बैल-बैलगाडी,नांगर, औजारे,पशु-पक्षी यांची माहिती मिळविली आहे.

२ ब ·२: उत्पन्न :

शेतमजुरांना कोणकोणत्या उत्पन्नाच्या बाबीपासून किती प्रमाणात उत्पन्न मिळते· तसेच त्यांना वर्षामध्ये किती दिवस मजुरीचे काम मिळते· त्याचबरोबर कामाचा मोबदला म्हणून दैनंदिन किती मजुरी मिळते याचा विचार या सदरामध्ये करण्यात आला आहे·

२ ब·३: खर्च :

शेतमजुरांना वरील सर्व बाबींपासून मिळणारे उत्पन्न,शेतमजुरांकडून कशाप्रकारे व खर्च केले जाते· याची माहिती येथे मिळविली आहे· - शेतमजुरांच्या खर्चामध्ये (क) जीवनावश्यक गरज (ख) इतर गरजा (ग) व्यसने (घ) इंधन (च) कपडे (छ) पादत्राणे(ज ) वैद्यकिय सेवा (झ) मनोरंजन (ट) प्रसाधने (ठ) सुखसोई (ड) शिक्षण (ढ) भांडी (ण) इतर खर्च व (त) दागीने यांच्यावर एकूण खर्च किती,कशाप्रमाणामध्ये केला जातो; तर या प्रत्येक विभागावर केल्या जाणा-या खर्चाची एकूण खर्चाशी असलेली टक्केवारी या सर्वांचा विचार करण्यात आला आहे·

२ ब·४ : कर्ज :

शेतमजुरांच्या उत्पन्न खर्चानंतर त्यांच्या कर्जाची पहाणी केली आहे· यामध्ये शेतमजुरांनी बँक,सावकार,मित्र,नातेवाईक यांच्याकडून घेतलेले कर्ज, त्यांची मुदत,व्याजदर,याचा अभ्यास केला आहे·

२ ब·५ : शेतमजूरांची बचत :

शेतमजुरांकडून केली जाणारी बचत,बचतीचा प्रकार,बचतीची मुदत, बचत ठेवण्याचा मार्ग,यासंबंधी माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे·

.... २२/-

२ ब.६ :

शेतमजुरांच्या घरात उपलब्ध असणा-या सुखसोई,जाणून घेवून त्यांच्या राहणीमानाचा अंदाज बांधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

याप्रकारे सर्वकष माहिती मिळविण्याच्या दृष्टीने तयार केलेल्या प्रश्नावलीच्या सहाय्याने अगोदर ठरविलेल्या शेतमजुरांच्या मुलाखाती स्वत: घेतल्या, या मुलाखातीतून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करुन त्याआधारे निष्कर्ष काढले आहेत.

प्रकरणांची माहिती :

सदर सर्वेक्षणासाठी तयार केलेली प्रश्नावली स्वत: प्रत्येक शेतमजुराकडे जावून भरुन घेतली. हे काम एप्रिल १९८८ पासून जून १९८८ पर्यंत चालले - उत्पन्न, खर्च, कर्ज,बचत ही आकडेवारी १९८७-८८ वर्षाची आहे.

पहिल्या प्रकरणात शेतमजूर ही संकल्पना स्पष्ट करुन भारतातील शेतमजुरांची परिस्थिती मांडली आहे.

दुस-या प्रकरणात ज्या कामेरी गावात हे सर्वेक्षण केले आहे. त्या गावच्या परिस्थितीचा आढावा घेतला असून अंगिकारलेल्या संशोधन पध्दतीची माहिती दिली आहे.

तिस-या प्रकरणात शेतमजुरांच्या वैयक्तिक व कौटुंबिक माहितीचे विश्लेषण केले आहे. त्यात शेतमजुरांचे जन्मगांव,वय,शिक्षण,जमीन, - कुटुंबाचे आकारमान,शेतमजुरांची गतीशिलता,तौलनिक साक्षरता,तौलनिक जमीन धारणा क्षेत्र,निवासस्थाने,बैलजोडी,बैलगाडी,नांगर-औजारे, पशुपक्षी व सहकारी संस्थेचे सभासदत्व या बाबींचा अभ्यास केला आहे.

.... २३/-

चौथ्या प्रकरणात तीनही गटातील शेतमजुरांच्या उत्पन्नाच्या माहितीचे विवेचन केलेले आहे. त्यात एकूण उत्पन्न, उत्पन्नातील विविध घटकांचे तौलनिक स्थान, मिळणाऱ्या मजूरीचा दर, वर्षातून काम मिळणारे दिवस या गोष्टी घेतलेल्या आहेत. तसेच अल्प भू-धारक भूहीन व - खंडकरी शेतमजूरांच्या खर्चाचे पृथ्थकरण केलेले आहे.

पाचव्या प्रकरणात शेतमजुरांचे कर्ज व बचत यांची आकडेवारी दिलेली आहे. बचतीचे प्रमाण, बचत ठेवण्याचे मार्ग, मिळणारा व्याजाचा दर तसेच त्यांनी घेतलेले कर्ज, कर्जाचे मार्ग, कर्जाची मुदत व्याजाचा दर, परत-फेडीतील दिरंगाई, त्यांची कारणे या गोष्टीचा आढावा घेतलेला आहे.

सहाव्या प्रकरणामध्ये शेतमजुरांकडे असणाऱ्या सुखसोईच्या वस्तूंचा परामर्श घेण्यात आलेला आहे.

या सर्व विवेचनाचे निष्कर्ष सातव्या प्रकरणात मांडले असून त्या आधारे काही व्यवहारीक उपाय निर्देशीत केलेले आहेत.

परिशिष्टामध्ये अल्पभू-धारक, भूहीन, व खंडकरी शेतमजुरांची माहिती गोळा करण्यासाठी वापरलेली प्रश्नावली व संदर्भसूचीचाही समावेश करण्यात आलेला आहे.

. . . .